# प्राधिकरण उभारणार दोन हजार कोटींचे 'स्पेशल टाऊनशिप'

पिंपरी : औद्योगिक नगरीतील कामगारांचे घराचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सेक्टर बारा मध्ये ५३ हेक्टर जागेवर दोन हजार कोटींची 'स्पेशल टाऊनशिप' उभारण्याचा निर्णय घेतला असून, यामाध्यमातून १५ हजार घरे उपलब्ध होणार आहेत. देशातील पहिला पथदर्शी प्रकल्प हे याचे वैशिष्ट्ये असल्याचे केंद्रीय गृहनिर्माण विभागाने नमूद केले आहे.

जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजना (जेएनएनयुआरएम) आणि 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप' (पीपीपी) अंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, प्रकल्पासाठी केंद्र सरकारचे २५ टक्के, लाभार्थी २५ टक्के, आणि ठेकेदाराचा ५० टक्के सहभाग असेल. त्यामुळे प्राधिकरणाला जमिन देण्याव्यतिरिक्त कोणताही खर्च करावा लागणार नाही. तर जमिनीच्या

## १५ हजार घरांची निर्मिती

अधिमूल्यापोटी प्राधिकरणाला ठेकेदाराकडून ५० कोटी मिळणार आहेत. पुढील चार वर्षात हा प्रकल्प पुर्ण करावयाचा आहे.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सेक्टर बारामध्ये घरे बांधण्याची योजना जाहीर केली. मात्र या योजनेला प्राधिकरणाची बांधकाम नियमावली अडथळा ठरत होती. प्राधिकरणाच्या मंजुर विकास नियमावलीमध्ये एक चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याची तरतुद असल्यामुळे 'बेसिक सर्व्हिसेस टू अर्बन पुअर'(बीएसयुपी) अंतर्गत 'स्पेशल टाऊनशिप' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे शासनाने २.५ 'एफएसआय'ची मंजुरी दिली.

या योजनेतंर्गत एकूण १५ हजार सदनिका उपलब्ध होतील. त्यामध्ये ५०४० सदनिका अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थींना देण्यात येतील. २३२९ सदनिकांची सोडत पध्दतीने तर ठेकेदाराला खुल्या विक्रीकरिता २४०० सदनिका उपलब्ध होणार आहेत. या सदनिका साधारण ४००, ६०० आणि ८०० चौरस फुटांच्या असतील. याबाबत प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास दिवसे म्हणाले, प्राधिकरणाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घरे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे कमीत कमी जागेमध्ये जास्तीत जास्त घरे बांधणे गरजेचे असून, त्यामुळे घरांच्या किंमती आवाक्यात राहतील. २.५ एफएसआय मिळाल्यामुळे १४ लाख चौरसमीटर क्षेत्र अधिक उपलब्ध झाल्याचे दिवसे यांनी सांगितले.

एकुण प्रकल्प २ हजार कोटींचा आहे. त्यामध्ये केंद्र आणि लाभार्थी यांच्या माध्यमातून ४१७ कोटी रूपये उपलब्ध होणार असून, इतर निधी ठेकेदार आणि पीपीपी माध्यमातून उपलब्ध होईल असे दिवसे म्हणाले. केंद्र आणि लाभार्थी यांच्याकडून मिळणारा हिस्सा टप्प्याटप्प्याने ठेकेदाराला देण्यात येणार आहे. प्राधिकरणाचे अध्यक्ष दिलीप बंड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये या प्रकल्पासाठी मुंबईतील 'डी.बी. रियालिटी' यांना काम देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. यांनी पुढील चार वर्षांच्या काळात हा प्रकल्प पुर्ण करणे आवश्यक आहे.

**भौतिक सुविधांचाही समावेश**

प्राधिकरणाने 'बेसिक सर्व्हिसेस टू अर्बन पुअर '(बीएसयुपी) या प्रकल्पामध्ये भौतिक व पायाभूत सुविधांचाही अंतर्भाव केला असून, यामुळे आरक्षित जागांवर सुसज्ज हॉस्पीटल, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, समाजमंदीर, अंगणवाडी, रिक्षा स्टँड, भाजी मंडई तसेच रस्ते, वीज, पाणीपुरवठा यासारख्या सुविधांही ठेकेदार देणार आहे

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये**

- देशातील पहिला पथदर्शी प्रकल्प
- ५३ हेक्टर जागा, १५ हजार घरे
- प्राधिकरणास जागेपोटी मिळणार ५० कोटी
- 'स्पेशल टाऊनशिप'च्या माध्यमातून प्रकल्प
- अत्यल्प उत्पन्न गटासाठी ५०४९ सदनिका
- अ ब क गटाच्या २३२९ सदनिका देणार
- ठेकेदाराला २५ टक्के हिस्सा खुल्या विक्रीकरिता
- प्रकल्पाचा खर्च २००० कोटी